



**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासी कविता

स्वाती कैलास गोडे
रा. आ. पोदार महाविद्यालय (स्वायत्त),
मुंबई.

## प्रास्ताविक :-

आदिवासी म्हणजे या देशाचे मूळ निवासी असे मानले जाते. आदिम म्हणजे मानवी जीवनाची प्राचीनतम, निसर्ग जीवनावरचा असे मानल्यास मानवी जीवनाच्या प्राचीनतम अवशेषासह श्रध्देने व चिवटपणाने आपल्या प्राचीनतम अवशेषांना जपून जीवन जगणाऱ्या लोकसमुहाला आदिम असे म्हणता येईल. आदिवासी समाज जीवनाचा विवक्षित असा इतिहास आहे.

अनुसूचित जाती जमाती आदेश सुधारणा कायदा १९७६(१९७६ चा १०८) परिशिष्ट १मधील भाग ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ४७ आदिवासी जमातींचा निर्देश केला आहे.त्यापरत्वे आदिवासी साहित्याकडे सामाजिक व सांस्कृतिक परिप्रेक्षात पाहता येईल.

आदिवासी साहित्याचा इतिहास:- आदिवासी साहित्याला फार मोठी परंपरा आहे आदिवासी कवितेची परंपरा तर प्राचीन असून इ.एस.पूर्व १३४२ मध्ये जव्हार संस्थानात घेऊन जाते. जयबा राजे मुकणे यांच्या राजदरबारी नारो भिल्ल व सक्रू महादेव कोळी यांच्या काव्यरचनेपर्यंत इतिहासात घेऊन जाते. नारू भिल्लाचे लग्न उत्सवात गायले जाणारे ‘मधुपर्कादि’ याची नोंद “जव्हार येथील लग्नसमारंभ” या १९९५ साली लिहल्या चित्रमय जगत येथे आढळते. तर सक्रू महादेव कोळी यांनी मोगलांच्या छाळाविरुद्ध लिहलेले काव्य क्रांतीचा वणवा दाखवते. “मुगलबाजी दगाबाजी स्वारी करती आम्हावरी...म्हणते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची ही परंपरा १४ व्या शतकापासून आदिवासी कवींनी कवितेच्या माध्यमातून सुरू केल्याचे त्रोटक पुरावे सापडतात. तसेच १८०० ते १९४७ या दिडशे वर्षाच्या काळात आदिवासी कवींनी रचना केल्याचे पुरावे

सापडतात. त्यापैकी शहीद क्रांतिवीर शंकरशहा यांनी जुलमी लाल तोंडाचा नायनाट व्हावा अशी करुणगीते गायली, ‘मार अँग्रेजन, कर देय मात चंडी!, शंकर की रक्षा कर, दास प्रतिपाल कर! म्हणत करुणा भाकतात.ही आदिवासी कलेची परंपरा आढळते. त्यानंतर बराच काळ प्रतीक्षा करावी लागली.

१९५० ते २००० या कालखंडात आदिवासी साहित्य म्हणून जे काही उजेडात आले आहे, त्याचे पुढीलप्रमाणे दोन भाग पडतात:

१) आदिवासीएतरांनी आदिवासींवर लिहलेले साहित्य.

२) आदिवासींनी आदिवासींवर लिहलेले साहित्य.

आदिवासीएतरांनी आदिवासींवर लिहलेले साहित्य:- विविध चळवळींच्या रेट्यामुळे स्वातंत्रोत्यर काळात आदिवासी समूहांमध्ये नवे वैचारिक जागरण सुरू झाले. पुढारलेल्या संपर्क सानिध्यामुळे आणि काही अंशी सुरु झालेल्या दळणवळणामुळे आदिवासी अभ्यासकांच्या संशोधकांच्या हळूहळू चिंतनपरिघात येत गेला. तो साहित्याचा, काव्याचा विषय झाला. समता, बंधुता, स्वातंत्र्यv व न्याय यापासून आदिवासी वंचित राहू नये यादृष्टीने वाटचाल सुरु झाली. त्याची काहींनी आस्थेने दखल घेणे आपले कर्तव्य मानले.मराठी कविताही त्यापासून दूर राहू शकली नाही. आदिवासींच्या रूपाने एक नवीनता मराठी काव्यप्रांतात रुजली. यादृष्टीने कोरकू आदिवासींवरील वामन नारायण देशपांडे लिखित ‘कोरकू’ (१९५५) या खंडकाव्याचा उल्लेख करावा लागेल. त्यानंतर ‘एक हुंदका यासाठी’ (१९८५) यांचा काव्यसंग्रह. या काव्यासंदर्भात ‘भगवान भोईर यांची कविता ही या देशातील सामान्यातील सामान्य जणांच्या दुःखाचा बावटा खांद्यावर घेऊन अभिमानाने मिरवत जाताना आढळते’, असे प्रा. केशव मेश्राम यांनी या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हंटले आहे.

आदिवासिंनी आदिवासींवर लिहलेले साहित्य:- आदिम जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करीत अभिव्यक्त होणारी कविता मराठी साहित्यात अभावानेच पहायला मिळते. निसर्ग हीच आदिम जीवनाची आणि साहित्याची प्रेरणा आहे. निसर्ग शक्तींना देव मानून त्याची पूजा करण्याची धारणा आदिवासी समूहात ओतप्रोत भरलेली आहे. ज्या स्वाभाविक नियमानुसार अवतीभवतीची

सृष्टी समृद्ध व्हावी ही आदिम जीवनधारणा आहे. ही धारणा व्यक्त होताना काही शाश्वत मूल्यांसह व्यक्त होते. ही मूल्ये सबंध मानवी जीवनाची मूल्ये आहेत. ती या कवितेचा स्थायीभाव आहेत.

आदिवासी कविता:- १९८० नंतरच्या आदिवासी साहित्यात, कवितेच्या प्रांतात राजकीय, सामाजिक, आर्थिक विषयांचा वेध घेणारी कविता रचली गेली. समता प्रस्थापित करण्यासाठी, पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रीचे शोषण थांबवण्यासाठी, लोकशाहीच्या पराजयाची लक्तरे वेशीवर टांगण्यासाठी, सत्ता, संपत्ती आणि त्यातून निर्माण होणाऱ्या हुकूमशाहीचा धिक्कार करण्यासाठी, सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी कवितेसारखे शस्त्र हाती धरले गेले. आदिवासी कवी भुजंग मेश्राम, प्रभू राजगडकर, चामुलाल राठवा, वाहरू सोनवणे, बाबाराव मडावी, डॉ. गोविंद गारे, सुखदेव उईके ह्या कवींनी आदिम जीवन, संस्कृती, इतिहास आणि वर्तमानकालीन प्रश्न हाती घेऊन कवितेचे शस्त्र उगारले. इतिहास, संस्कृती, निसर्गजाणीवा, कला, सद्यस्थिती, दारिद्र्य, उपासमार, अन्याय, शोषण आणि या सर्वांतून आनंदी जीवन, धारणा यासर्वांसह आदिवासी कवितेचा परीघ समृद्ध होत आहे. या एकूण कवितासंग्रहांचा धांदोळा घेतल्यावर, आदिवासी भाषेत, आदिवासी जाणिवांसह, आदिवासी समाजजीवनातील मिथके, प्रतीके, प्रतिमांसह, आदिवासी धारणांसह कवितेची कलात्मकता, तिचे आशयकेंद्र फार मोठ्या कवींनी हाताळता आल्याचे दिसते. डॉ. गोविंद गारे, बाबाराव मडावी, उषाकिरण आत्राम, माधव सुरकुंडे, डॉ. संजय लोहकरे, डॉ. विनोद कुमेर या व अशा अनेक कवींनी आदिवासी कवितेतून अस्सल आदिवासी जाणिवांना कलात्मकतेने मांडले आहे.त्यात रडणे आहे, लढणे आहे. विद्रोह आहे, माणूसपण आहे. व्यवस्थेच्या विरुद्ध घेतलेली विशिष्ट भूमिकाही आहे. १९६२ साली सुकदेव उईके यांचा ‘मेटा पुंगार’ अर्थात ‘पहाडी फुल’ भाग १ व २ ही काव्यरचना प्रसिद्ध झाली.आदिवासींच्या सर्वांगीण परिवर्तनाचे व्यापक भान आणि कृतिवंतांच्या कार्यावरील अढळ श्रध्दा ही या कवितेची चेतनाकेंद्र आहेत. १९७५ मध्ये भुजंग मेश्राम यांचा ‘आदिवासी कविता’ हा गोंडी भाषेतील कविता संग्रह प्रसिध्द झाला. विशेष म्हणजे दाहक प्रश्न, ज्वलंत प्रतिमा, अर्थवाही दिशा यांचा सुरेख संगम यांच्या कवितांमध्ये आढळतो. महाराष्ट्रातील आदिवासींचा पहिलावहिला काव्यसंग्रह ‘मोहोळ’ १९८२ साली

प्रकाशित झाला. १९८७ मध्ये वाहरू सोनवणे यांचा 'गोधड' हा काव्यसंग्रह "माणुस्कीनी लढाई तं लढनाच पडी" अशा दृढ निर्धाराणे आदिवासींची अस्मिता जागविणारा एक सुजाण, दूरदर्शी, व्यापक भान जपणारे bवाहरू सोनवणे. १९८७ मध्ये 'गोंडवन पेटले आहे' तर १९९५ मध्ये'उलगुलान' रचणारे डॉ. विनायक तुमराम. १९९६ मध्ये डॉ. गोविंद गारे लिखित 'अनुभूती' तर प्रा. वामन शेळमाके यांचा ' जागवा मने पेटवा मशाली'.तर चामुलाल राठवा यांचा 'माझी सनद कुठे आहे'? या संग्रहाने साहित्य चळवळीला उत्कृषाच्या राजमार्गावर आणून सोडले.

आदिवासी कवयित्रींच्या पहिल्या पिढीतील ज्येष्ठ कवी उषाकिरण आत्राम ज्यांचा 'म्होरकी' १९९७ साली प्रकाशित झाला तर दुसऱ्या कुसुम आलाम 'रानआसवांचे तळे' १९९७ साली आला.

या व अशा अनेक कवी कवयित्रींनी आदिवासी साहित्याची परंपरा अबाधित राखली आहे. अर्थात साहित्याच्या अंगाने तिचे आकलन होणे अगत्याचे ठरते. जेणेकरुन साहित्यिक मूल्यांचे आयाम निश्चित सांगता येतात.

आदिवासी कविता साहित्यिक अंगविशेष्याच्या दृष्टिकोनातून :- साहित्य ही व्यामिश्र व अनेकांगी घटना आहे. साहित्याची एकच एक व्याख्या असंभव आहे. म्हणून त्याच्या अंगविशेषाद्वारे केवळ स्वरुप स्पष्ट करता येऊ शकते. प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी साहित्याची सात अंगे सांगितली आहेत. याचा उहापोह वानगीदाखल दोन काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने घेऊयात. डॉ.प्रा. विनोद कुमरे यांचा 'आगाजा' हा काव्यसंग्रह. तर डॉ. संजय लोहकरे यांचा 'झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं' आगाजा या कासव्यसंग्रहात एकूण २८ कविता आहेत.

साहित्याच्या भाषिक अनुषंगाने विचार करता गोंडी भाषेचा प्रभाव आढळतो. ज्यात अरण्य -३ निसटती-४, पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट...,आभासी -४,५,६, मोटिफ:एक होता राजा – १,४,५, सुरपनखेचा हेरंबेस व्हॉट्सअप रिप्लाय,जंगो,कोया पुंगार, कविता-३ या कविता आढळतात. हिंदी, इंग्रजी आणि प्रमाण मराठी भाषाही या काव्यसंग्रहात दिसून येते. यात आलेली प्रतीके, प्रतिमासृष्टी आशयाचे दाहकत्व दृगोचर करते. संरचनेच्या अनुषंगाने या कविता परिपूर्णतेकडे जाताना दिसते. वास्तव आणि कलात्मकतेचा ठाव घेताना सत्तेच्या प्रस्थापिततेला समोर ठेवते.

वैचारिक भूमिका स्पष्ट करताना मनाचा ठाव घेते, अंतर्मुख करते स्त्री चे शोषण सांगते. तर झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं या काव्यसंग्रहातील काव्यात महादेव कोळी समाजाची डांगाणी भाषा दृगोचर होते. ज्यात निसर्ग आणि आदिमतेची नाळ अतुट असल्याचा संदर्भ ठायी ठायी आढळतो. यात लहान मोठ्या ५४ कविता आहेत. पोरी बाजारा निंगाल्या, बाप चालला देसाले, फालिस्ट, कासाव म्हातारी यात डांगाणी भाषा तर काही हिंदी आणि प्रमाण भाषेतील कविता आढळते. आशयाच्या अनुषंगाने वास्तवतेचा दाह दिसतो. काव्याचा अनुबंध रचनेच्या दृष्टीने मुक्तछंदाकडे नेतो. समाज व्यवस्थेला, सरकारला , शासनाला प्रश्न गद्यात्मक दिसतो. तर स्वातंत्र्याला वेश्या म्हणतो, बुद्धाच्या आधीच स्थितप्रज्ञ बुद्ध कवींना आदिवासीत दिसतो. तर एन.जी.वो च्या फसव्या, तकलादू, बेगडी स्वरूपाचे दर्शन घडवीतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, आंदोलन चळवळींतला फरक स्पष्ट करतो.

एकूणच साहित्याच्या सातही अंगाला दोन्ही काव्यसंग्रह न्याय देताना आढळतात. साहित्यदृष्ट्या ते महत्वाचे असले तरीही एकूणच आदिवासी समाजाचे दाहक वास्तव सांगून वाचकाला विचार करायला भाग पाडतात.

समारोप:- मराठी साहित्यविश्वात आदिवासी साहित्याचे वेगळेपण त्यात येणाऱ्या प्रतिमा, प्रतीके, मिथके, जाणिवा आणि विशेष्य म्हणजे जाणिवाचे वास्तव भिन्न असून साहित्यात नवीन आयाम निश्चित करते. काव्य जाणिवांचा जिवंत आविष्कार ठरते. आत्ममग्न, स्वायंतसुखापासून आदिमतेच्या समीप नेते.

संदर्भ ग्रंथ :-

१ शरणकुमार लिंबोळे- मराठी वाडमयातील नवीन प्रवाह

२ डॉ माहेश्वरी गावित- महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध

३ डॉ. संजय लोहकरे- आदिवासी कवितेचे मापदंड

४. डॉ विनायक तुमराम- आदिवासी साहित्य -दिशा आणि दर्शन

५. डॉ. विनायक तुमराम- आदिवासी साहित्य स्वरुप आणि समिक्षा

६.डॉ हेमंत बळवंत मुकणे- जव्हार संस्कृतीची शोधयात्रा

७ डॉ. तुकाराम रोंगटे- आदिवासी साहित्य

आधारग्रंथ :-

१ डॉ. विनोद कुमरे – आगाजा

२ डॉ. संजय लोहकरे – झाड कधीच कुणाच्या मालकीचं नसतं